PO/2022-2023/009
10/10/2023.

भारतीय विद्या भवनचे

# सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय

मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५८.

## छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळा - २०२३

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त, आपल्या महाविद्यालयाच्या प्रशिक्षण व आस्थापना विभागाने व विद्यार्थी वसतीगृह समितीने, **दि. १९ फेब्रुवारी २०२३** रोजी **सकाळी ९.३० वाजता "छत्रपती शिवाजी महाराज: निश्चयाचा महामेरू"** या विषयावर, प्रसिध्द्ध इतिहास अभ्यासक व शिवव्याख्याते **श्री. रविराज पराडकर** यांचे व्याख्यान आयोजित केलेले आहे.

श्री. पराडकर यांनी वयाच्या १६ व्या वर्षापासून शिवचरित्र आणि इतिहास प्रसार कार्यासाठी महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे. त्यांनी सर्व गडकिल्ल्यांवर पदभ्रमंती केलेली असून, ऐतिहासिक वस्तू, वास्तू, दस्तावेज, ग्रंथ यांचा विशेष अभ्यास केलेलं आहे. त्यांनी सन १९९४ साली **रायगडावर श्रीशिवराजाभिषेकदिनोत्सवाची परंपरा** सुरू केली. त्यामुळे **शिवराजाभिषेकदिनोत्सवाचे संस्थापक** म्हणून श्री. पराडकर यांच्या बद्दल शिवभक्तांमध्ये विशेष आदर आहे. त्यांनी आज तागायत शिवचरित्र, शंभुचरित्र, मराठयांचा इतिहास, स्वामी विवेकानंद, स्वा . सावरकर अशा अनेक विषयांवर सुमारे ३०० हून अधिक व्याख्याने दिलेली आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज हे इ. स. १८१८ पर्यन्त टिकलेल्या आणि आपल्या परमोत्कर्षाच्या अवस्थेत भारतीय उपखंडाचा बराचसा भाग व्यापणाऱ्या मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. शिस्तबद्ध लष्कर व सुघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. भूगोल, आश्चर्यजनक वेगवान हालचाली आणि बलाढ्य शत्रूंचे मनोधैर्य खच्ची करणारे नेमके हल्ले यांचा वापर करणारे गनिमी काव्याचे तंत्र त्यांनी यशस्वीपणे वापरले. आपल्या वडिलांकडून मिळालेल्या २,००० सैनिकांच्या छोट्या तुकडीपासून एक लाख सैनिकांचे लष्कर महाराजांनी उभे केले. किनारी आणि अंतर्गत प्रदेशातील किल्ल्यांची डागडुजी करण्यासोबतच अनेक किल्लेही त्यांनी उभारले.

मला खात्री आहे की, या व्याख्यानाच्या निमित्ताने आपणा सर्वांना शिवाजी महाराजांच्या या अद्भुत कारकीर्दीचे स्मरण करण्याची संधी मिळेल.

या व्याख्याना व्यतिरिक्त, छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळा निमित्त इतरही विविध कार्यक्रमांचे संस्थेमध्ये आयोजन करण्यात आलेले आहे. सदर कार्यक्रमाची रूपरेषा या सूचनेसोबत जोडलेली आहे.

तरी, आपल्या संस्थेमधील व भारतीय विद्या भवन, अंधेरी परिवरातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या कार्यक्रमात आवर्जून सहभागी व्हावे असे आवाहन मी सर्वांना करतो.

दि. १० फेब्रुवारी २०२३

प्र. प्राचार्य
सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय

## भारतीय विद्या भवनचे
# सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय

# छत्रपती शिवाजी महाराज
## जन्मोत्सव सोहळा - २०२३



**निश्चयाचा महामेरु। बहुत जनांसी आधारु।**
**अखंड स्थितींचा निर्धारू। श्रीमंत योगी ॥**

**वेळ-** १९ फेब्रुवारी २०२३,
सकाळी ९:३० वाजता
**स्थळ-** सेमिनार हॉल ११९

## व्याख्यान
**छत्रपती शिवाजी महाराज -**
निश्चयाचा महामेरु

**व्याख्याते - श्री. रविराज पराडकर**

| **वेळ** | **रूपरेषा** |
|---|---|
| सकाळी ९:०० ते ९:३० | पालखी सोहळा वसतिगृह ते मुख्य इमारत |
| ९:३० ते ९:४५ | मुख्य अतिथींचे  स्वागत |
| १०:०० ते ११:३० | व्याख्यान |
| ११:३० ते ११:४५ | अल्पोपहार |
| १२:०० ते १:३० | स्पंदन गायन कार्यक्रम व नाटक (पोवाडा) |
| २:०० ते ३:३० | विविध स्पर्धा |
| २:०० ते ५:३० | रक्तदान शिबिर |

### आयोजक
- प्रशिक्षण व आस्थापना विभाग
- वसतिगृह,विद्यार्थी समिती